शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ८वी

विषय – मराठी (प्रथम भाषा)

घटक 2 - शब्दसंपत्ती

भारांश – 24% प्रश्नसंख्या – 6 एकूण गुण 12

2.6 म्हणी

- कोणताही आशय अगदी थोडक्यात, पण परिणामकारकपणे व्यक्त करायचा असल्यास आपण म्हणींचा वापर करतो.
- रोजच्या व्यवहारातील अनुभव म्हणींमध्ये अगदी थोडक्यात सांगितलेला असतो.
- म्हणीतून सूत्रमय पध्दतीने शहाणपणाचे जणू सिद्धांतच मांडलेले असतात.
- तुम्ही म्हणींचा अभ्यास करण्यासाठी त्यांचा संग्रह करा.

उदा.

- एका म्यानात दोन तलवारी राहत नाहीत – दोन तेजस्वी माणसे एकाच ठिकाणी राहू शकत नाहीत.

दोन महत्वाकांक्षी नेते एकाच पक्षात एकत्र काम करू न शकल्याने एकाने स्वतःचा नवीन पक्ष स्थापन केला. एका म्यानात दोन तलवारी राहत नाहीत हेच जणू पुन्हा सिद्ध झाले.

- कुत्र्याचे शेपूट नळीत घातले तरी वाकडे ते वाकडेच – अविचारी व मूर्ख माणसाला कितीही समजावून सांगितले तरी त्याचा काहीही उपयोग होत नाही.

तंबाखूच्या दुष्परिणामांची जाणीव करून देऊनही सुधाकररावांनी तंबाखू सेवन सोडले नाही म्हणतात ना कुत्र्याचे शेपूट नळीत घातले तरी वाकडे ते वाकडेच.

प्र. 1 योग्य शब्द वापरून म्हण पूर्ण करा.

घरी ……. अन बाहेर दिवाळी.

1) दसरा 2) पाडवा 3) शिमगा 4) पोळा

उत्तर – पर्याय – 3

अर्थ – घरात खूप गरिबी आणि बाहेर मात्र उधळपट्टी.

प्र. 2 पुढील आकृतीत लपलेली म्हण ओळखून म्हणीतील बरोबर मध्यभागी कोणते अक्षर येईल ते शोधा.

ह	द	णि	री	पी	गो	ळ	हो	आ

1) आ 2) गो 3) हो 4) णि

उत्तर – पर्याय – 1

'पी हळद आणि हो गोरी' ही म्हण तयार होते.

प्र.3 पुढीलपैकी कोणत्या दोन पर्यायातील म्हणींचा अर्थ एकच आहे ?

1) पळसाला पाने तीनच 2) अचाट खाणे मसणात जाणे

3)जेवीन तर तुपाशी नाहीतर उपाशी 4)घरोघरी मातीच्या चुली

उत्तर – पर्याय – 1 व 4

'पळसाला पाने तीनच' व 'घरोघरी मातीच्या चुली' या दोन्ही म्हणींचा अर्थ 'सर्वत्र परिस्थिती सारखीच' असा होतो.

2.7 पारिभाषिक शब्द

मराठीत रूढ झालेल्या इतर भाषांमधील शब्दांना 'पारिभाषिक शब्द' म्हणतात.

इतर भाषेमधून मराठीत आलेल्या शब्दांची काही उदाहरणे –

हिंदी	कानडी	गुजराती	पोर्तुगीज	फारसी	अरबी	तेलगु	इंग्रजी
दाम	भाकरी	डबा	पगार	पेशवा	इनाम	अनारसा	पेन
करोड	गुढी	शेट	बटाटा	अत्तर	मेहनत	चेंडू	टेबल
मिठाई	विळी	घी	पेरू	कामगार	हुकूम	गदारोळ	फी
भाई	ताई	दादर	कोबी	सामान	अर्ज	ताळा	बस
बेटा	तूप	रिकामटेकडा	तंबाखू	पोशाख	जाहीर	गादी	फाइल

प्र.1 पुढीलपैकी अरबी भाषेतील शब्द कोणता ?

1) खर्च 2) बँक 3) चाकरी 4) मिठाई

उत्तर – पर्याय – 1

स्पष्टीकरण- बँक (इंग्रजी), चाकरी (कानडी), मिठाई (हिंदी) भाषेतील शब्द आहेत.

प्र. 2 पुढीलपैकी इंग्रजी भाषेतून न आलेला शब्द कोणता ?

1) कप 2) बाजरी 3) लक 4) पेन

उत्तर – पर्याय – 2

स्पष्टीकरण- बाजरी हा देशी शब्द आहे.

प्र. 3 पुढीलपैकी पारिभाषिक शब्द ओळखा.

1) अंतर 2) पेपर 3)चरण 4) कापूर

उत्तर – पर्याय – 2

स्पष्टीकरण- पेपर हा इंग्रजीमधून मराठी भाषेत आलेला शब्द आहे.

प्र. 4 'ड्रामा' (Drama) शब्दासाठी मराठी भाषेतील योग्य शब्द ओळखा.

1) नाटक 2) चित्रपट 3) बोलपट 4) संमेलन

उत्तर – पर्याय – 1

प्र. 5 पुढीलपैकी पारिभाषिक शब्द किती आहेत ते ओळखा.

बच्चा, वांगे, गाजर, गुडघा, भाकरी, डॉक्टर, मंजूर, चिमणी, डोळे, झाड, मेहनत

1) ५ 2) ७ 3) ६ 4) ४

उत्तर – पर्याय – 3

वांगे, गुडघा, चिमणी, डोळे, झाड हे देशी शब्द आहेत, पारिभाषिक नाहीत.

प्र. 6 खालील अर्थपूर्ण म्हणीतील अनुक्रमे दुसऱ्या व सातव्या अक्षरापासून तयार होणाऱ्या शब्दाचा समानार्थी शब्द निवडा.

चे	का	म	रा	ऐ	चे	ना	क	ना	वे	वे	ज

1) कावळा 2) तुरुंग 3) कोकिळ 4) कार्य

उत्तर – पर्याय – 1

‘ऐकावे जनाचे करावे मनाचे’ ही म्हण तयार होते. दुसरा व सातवा शब्द ‘काक’ (कावळा) तयार होतो.

अभिप्राय

ग्रामीण विभाग 282 गुण- राज्यात चौथी

(पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा 2025)

नमस्कार, मी संस्कृती. कविता, संवाद, उतारा व शब्दसंपत्तीवरील विविध प्रश्न सोडवताना अवांतर वाचन आणि 6 वी ते 8 वी मराठी पाठ्यपुस्तकाच्या सखोल वाचनाचा खूप उपयोग झाला. व्याकरणाचे जे घटक अवघड वाटायचे त्यासाठी जास्त वेळ देवून सराव केला. मराठी वाचनासाठी नियमित वेळ दिला. मराठीच्या मार्गदर्शिका सौ. प्रतिभा काळे मॅडम यांनी आकलनावर विशेष भर दिला. सराव पेपर झाल्यानंतर ज्या घटकावरील प्रश्न चुकला असेल त्या घटकाची पुनः उजळणी करण्याची माझी सवय होती. यामुळेच मी मराठीत उत्तम गुण मिळवून राज्य गुणवत्ता यादीत स्थान मिळवू शकले.

- संस्कृती श्रीकांत विरोळे

- जि.प.प्राथ. शाळा वाबळेवाडी, ता. शिरूर, जि.पुणे

सरावासाठी प्रश्न

प्र. 1 ‘बाहेरून गरीब दिसणारी पण मनात कपट असणारी व गुप्तपणे खोडसाळपणा करणारी व्यक्ती’ या अर्थाची अचूक म्हण ओळखा (2017)

1) गरज सरो, वैद्य मरो 2) गोगलगाय आणि पोटात पाय
3)चोराच्या मनात चांदणे 4) चित्त नाही थारी, बावन्न तीर्थे करी

प्र. 2 पुढील चौकटीतील अक्षरांपासून अर्थपूर्ण म्हण तयार होते. त्या म्हणीतील अनुक्रमे दुसरे व सातवे अक्षर घेऊन तयार होणाऱ्या अर्थपूर्ण शब्दाचा विरुद्धार्थी शब्द निवडा. (2020)

ळ	त	ळ	ज
णा	शी	व	धु
णा	व	शी	दे

1) कोमल 2) अशी 3) थंड 4) उष्ण

प्र.3 पुढीलपैकी गुजराती भाषेतील शब्द ओळखा. (2021)

1) एजंट 2) चाकरी 3) मेहनत 4) दलाल

प्र. 4 ‘परमेश्वराच्या कृतीचा उलगडा माणसाच्याने होत नाही.’ या अर्थाची योग्य म्हण पर्यायातून निवडा.(2024)

1) देवाची करणी, नारळात पाणी.
2) देवळात दाटी, अंगाऱ्यासाठी.
3) भोळ्याचे देव सोळा.
4) आंधळा मागतो एक डोळा, देव देतो दोन.

प्र. 5 पुढील आकृतीत असलेल्या अक्षरांपासून तयार होणाऱ्या म्हणीचा योग्य अर्थ पर्यायातून निवडा. (2023)

न	डा	न	वी	स	का	ठे	ध्या	कु

1) नेहमी सावधगिरीने बोलावे .

2) अनुभवल्याशिवाय शहाणपण येत नाही.

3) आपल्यामागे जे चालते, त्याकडे दुर्लक्ष करणे.

4) आपले दोष आपणांस दिसत नाहीत.

प्र. 6 ' नाव मोठं, लक्षण खोटं' या म्हणीचा अर्थ असणारी म्हण पर्यायांतून निवडा.

1) खाण तशी माती 2) काप गेले नि भोके राहिली

3)घर फिरले की घराचे वासेही फिरतात. 4) बडा घर पोकळ वासा

प्र. 7 केव्हज (caves) या शब्दाला मराठीत प्रतिशब्द कोणता ?

1) डोंगर 2) गुहा 3) विहीर 4) दरी

प्र. 8 पारिभाषिक शब्दांची योग्य जोडी ओळखा. (दोन अचूक पर्याय निवडा)

1) रेडिओ – भ्रमणध्वनी 2) टेलिव्हिजन – दूरचित्रवाणी

3)टेलिफोन – आकाशवाणी 4) इंटरनेट – आंतरजाल

प्र. 9 खाली काही म्हणी दिल्या आहेत, त्यापैकी भिन्न अर्थाची म्हण ओळखा.

1) पळसाला पाने तीनच 2) यथा राजा तथा प्रजा

3)घरोघरी मातीच्या चुली 4) गाव तिथे पाणवठा

प्र. 10 खालील म्हण पूर्ण करा.

भटाला दिली ओसरी, भट .... पसरी.

1) अंथरूण 2) कापड 3) अंग 4) हात पाय

उत्तरे

1. 2
2. 4
3. 4
4. 1
5. 1
6. 4
7. 2
8. 2 व 4
9. 2
10. 4